www.rajdand.com
सातारा, गुरुवार
02.02.2023
पृष्ठ : ४ | मूल्य : ₹ ४.०० | माघ शु.११
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

**अर्थसंल्पाचे सात प्राधान्यक्रम - सप्तर्षी**

१.सर्वसमावेशक विकास
२. शेवटच्या घटकापर्यंत विकास
३. पायाभूत सुविधांचा विकास
४. क्षमतांमध्ये वाढ करणे
५. ग्रीन ग्रोथ
६. युवाशक्ती
७. आर्थिक क्षेत्र



# अर्थसंकल्पात मध्यमवर्ग नोकरदारांना मोठा दिलासा

## सात लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना कोणताही कर नाही



- संसदेत २०२३-२४ अर्थसंकल्प सादर
- २०२४ च्या निवडणुकांपूर्वीचा मोदी सरकारचा हा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प
- कर रचनेत बदल; नवीन करप्रणाली लागू
- नवीन कर प्रणालीमध्ये कर-सवलत मर्यादा ७ लाख रुपयांपर्यंत वाढविली
- ३ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना कोणताही कर नाही
- देशातील शेतकऱ्यांसाठी डिजीटल प्लॅटफॉर्म उभारणार
- भारताला बाजरींचे जागतिक केंद्र बनविण्यावर भर
- पीएम आवास योजनेत तब्बल ६६ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे
- वेस्ट टू हेल्थ'साठी 'गोबरधन योजना', ५०० नवीन प्लँटची घोषणा

**नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी बुधवारी संसदेत अर्थसंकल्प २०२३-२४ सादर केला. २०२४ च्या निवडणुकांपूर्वीचा मोदी सरकारचा हा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प आहे. सकाळी ११ वाजता लोकसभेत अर्थसंकल्प सादर करण्यात आला. देशातील विकास हा सर्वसमावेशक असावा आणि देशातील कष्टकरी मध्यमवर्गाला लाभ मिळावा, या उद्देशाने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत अर्थसंकल्प सादर करताना काही महत्त्वाच्या घोषणा केल्या. त्यामध्ये कर माफी, कर संरचनेत बदल, नवीन कर प्रणालीमध्ये नियमित वजावटीच्या लाभाचा विस्तार, सर्वोच्च अधिभार दरात कपात आणि अशासकीय पगारदार कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी जमा रजांच्या रोखीवर कर सवलतीची मर्यादा वाढवणे यांचा समावेश आहे. अर्थमंत्र्यांनी केलेल्या या घोषणेमुळे नोकरदार मध्यमवर्गाला भरीव फायदा मिळणार असल्याचं सांगण्यात येतंय.**

अर्थमंत्र्यांनी नवीन कर प्रणालीमध्ये कर-सवलत मर्यादा ७ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव दिला. त्यामुळे ज्यांचे उत्पन्न सात लाखापर्यंत आहे, अशा व्यक्तीला कोणताही कर भरावा लागणार नाही. सध्या,जुन्या आणि नवीन दोन्ही कर प्रणालींमध्ये ज्यांचे उत्पन्न पाच लाखापर्यंत आहे, अशा व्यक्ती कोणताही आयकर भरावा लागत नाहीत. मध्यमवर्गीय व्यक्तींना दिलासा देत, वैयक्तिक आयकर प्रणालीमध्ये कर रचनेत बदल करून, स्लॅबच संख्या पाचपर्यंत कमी करून पाचवर आणण्याचा आणि कर सवलत मर्यादा रुपये ३ लाखापर्यंत पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मांडला.

नवीन कर-प्रणालीमधील सर्व करदात्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. वार्षिक उत्पन्न नऊ लाख असलेल्या व्यक्तीला केवळ ४५,००० रुपये कर भरावा लागेल. जो त्याच्या उत्पन्नाच्या केवळ ५ टक्के असेल. सध्या कर स्वरुपात भरावी लागणारी रक्कम ही ६०,००० इतकी आहे. त्यामध्ये २५ टक्के कपात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, १५ लाख रुपये उत्पन्न असलेल्या व्यक्तीला १.५ लाख रुपये, अथवा त्याच्या उत्पन्नाच्या १० टक्के कर भरावा लागेल, जी सध्या भराव्या लागत असलेल्या १,८७,५०० रुपये करात २० टक्के कपात आहे.

अर्थसंकल्पाच्या तिसऱ्या प्रस्तावात कौटुंबिक निवृत्ती वेतनधारकांसह पगारदार वर्ग आणि निवृत्तीवेतन धारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण स्टँडर्ड डिडक्शनचा फायदा नवीन कर प्रणालीमध्ये देखील देण्याचा प्रस्ताव अर्थमंत्र्यांनी मांडला आहे. त्यामुळे १५.५ लाख अथवा त्यापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या प्रत्येक पगारदार व्यक्तीला ५२,५०० रुपयांचा लाभ मिळणार आहे. सध्या जुन्या कर प्रणालीमध्ये पगारदार व्यक्तींना ५०,००० रुपये, तर कौटुंबिक निवृत्तीवेतन धारकांना १५,००० रुपये स्टँडर्ड डिडक्शनचा लाभ मिळतो.

निर्मला सीतारमण यांनी नवीन करप्रणालीमध्ये २ कोटी पेक्षा जास्त उत्पन्नासाठी सरचार्ज दर ३७ टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव दिला. यामुळे जगात सर्वाधिक असलेला सध्याचा दर ४२.७४ टक्क्यांवरून ३९ टक्क्यांपर्यंत कमी येईल.

अर्थसंकल्पात बिगर-सरकारी पगारदार व्यक्तींच्या निवृत्तीच्या वेळी रजा रोखीकरणावरील कर सवलतीची मर्यादा, सरकारी पगारदार व्यक्तींच्या बरोबरीने २५ लाखांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. सध्या सूट मिळू शकणारी कमाल रक्कम ३ लाख रुपये इतकी आहे.

कोणतीही कर वजावटीच्या सवलतीशिवाय असलेली नवी कर प्रणाली आणण्यासाठी सरकारचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट वक्तव्य अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केले. आज लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी नव्या कर प्रणालीसह इतर सर्व मुद्यांवर भाष्य केले. या अर्थसंकल्पात खर्च आणि उत्पन्नात ताळमेळ बसवण्याचा प्रयत्न केला असल्याचे निर्मला सीतारमण यांनी सांगितले.

आमचे सरकार सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीत समतोल साधण्याचा प्रयत्न करत असून यासोबतच कर नियम सुलभ करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. यासोबतच एमएसएमई क्षेत्राला मोठी कर्जे देऊन आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे निर्मला सीतारमण यांनी पत्रकार परिषदेत म्हटले.

**नव्या कर प्रणालीबाबत काय म्हटले?**

यंदाच्या अर्थसंकल्पात जुनी कर प्रणाली पर्यायी ठेवताना नवी कर प्रणाली लागू केल्याची घोषणा अर्थसंकल्पीय भाषणात करण्यात आली. निर्मला सीतारमण यांनी सांगितले की, कोणत्याही कर सवलतीशिवाय असलेली नवीन कर प्रणाली लागू करण्याचा प्रयत्न सरकारचा असल्याचे निर्मला सीतारमण यांनी म्हटले.

टॅक्स स्लॅबमध्ये करण्यात आलेल्या बदलाचा फायदा मध्यमवर्गाला होणार असल्याचे त्यांनी म्हटले. सरकार वेगवेगळ्या क्षेत्रात डिजीटल अर्थव्यवस्था सुरू करण्याच्या प्रयत्नात आहे. सरकारने यावेळी प्रथमच दुहेरी आकड्यांमध्ये भांडवली खर्चाची तरतूद केली आहे. १० लाख कोटी रुपयांच्या भांडवली गुंतवणुकीच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्याचे सरकारचे प्राधान्य आहे. रोजगार वाढवण्यावर सरकारचा भर आहे आणि त्याचवेळी त्याला गती देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी म्हटले.

महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात आला असून देशाच्या प्रगतीत त्यांचा सहभाग अधिक वाढवला जात असल्याचे त्यांनी सांगितले. औद्योगिक विकासासाठी सरकारही जोरदार प्रयत्न करत असून औद्योगिक क्रांती ४.0 च्या माध्यमातून लोकांना प्रशिक्षित करून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अर्थसंकल्पात पर्यटन क्षेत्रासाठी तरुणांना प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात येत असून पर्यटन उद्योगासाठी अर्थसंकल्पात केलेली तरतूद अत्यंत तर्कसंगत असल्याचा दावा निर्मला सीतारमण यांनी केला.

| काय स्वस्त होणार? | काय महाग? |
| --- | --- |
| मोबाईल फोन | सिगारेट |
| टीव्ही आणि टीव्हीचे सुटे भाग | एक्स-रे मशीन |
| इलेक्ट्रिक वाहने | विदेशी किचन चिमणी |
| इलेक्ट्रिक कारची बॅटरी | शराब |
| हिऱ्याचे दागिने | छत्री |
| खेळणी | सोने |
| कॅमेरा लेन्स | आयात केलेले चांदीचे दागिने |
| कपडे | चांदीची भांडी |
| बायोगॅसशी संबंधित वस्तू | प्लॅटिनम |
| लिथियम सेल्स | हिरा |
| सायकल | कम्पाऊंडेड रबर |

'वेस्ट टू हेल्थ'साठी मोदी सरकारची 'गोबरधन योजना', ५०० नवीन प्लँटची घोषणा

वेस्ट टू हेल्थ म्हणजे टाकाऊ वस्तूपासून आरोग्य निर्माण करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेच्या गतीला चालना देण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आज गोबरधन योजनेची घोषणा केली. गोबरधन (गॅल्वनायझिंग ऑरगॅनिक बायो-ॲग्रो रिसोर्सेस धन) योजनेंतर्गत ५०० नवीन 'वेस्ट टू वेल्थ' प्लँटची स्थापना करण्यात येणार आहे. या योजनेमुळे फिरत्या अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सांगितलं आहेत.

गोबरधन योजनेंतर्गत २०० कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्लांट्सचा समावेश असेल. यात शहरी भागातील ७५ प्लांट्स आणि ३०० सामुदायिक किंवा क्लस्टर-आधारित प्लांट्स यांचा समावेश असेल. योग्य वेळी, नैसर्गिक आणि जैव वायूचे विपणन करणाऱ्या सर्व संस्थांसाठी ५ टक्के उइऋ आदेश लागू केला जाईल. जैव-मास संकलन आणि जैव-खत वितरणासाठी, योग्य आर्थिक सहाय्य प्रदान केले जाईल.

**केंद्र सरकारच्या व्हिजनसाठी आर्थिक अजेंडा**

१) नागरिकांना संधी उपलब्ध करून देणे,
२) वाढ आणि रोजगार निर्मितीला मजबूत चालना देणे
३) आर्थिक स्थिरतेवर लक्ष केंद्रित करते.

## सरकारकडे असा येणार पैसा आणि असा होणार खर्च

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वीचा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात सरकारने आपल्या जमा-खर्चाचा लेखा-जोखा मांडताना अनेक योजना जाहीर केल्यात. केंद्र सरकारकडे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कराच्या माध्यमातून महसूल जमा होतो. त्याशिवाय, इतर मार्गाने सरकार विविध योजनांसाठी निधी उभारते.

**योजनांसाठी सरकार निधी कसा उभारणार?**

केंद्र सरकार २०२३-२४ या आर्थिक वर्षात एक रुपया खर्च करणार आहे. हा एक रुपया सरकारकडे कसा येणार, हे जाणून घेऊयात. या एक रुपयातील ३५ पैसे सरकार उधार, कर्ज घेणार आहे. तर, १७ पैसे जीएसटीच्या माध्यमातून मिळवणार. १५ पैसे हे कॉर्पोरेट टॅक्सच्या



माध्यमातून जमा होतील. तर, १५ प्राप्तिकर आणि ४ पैसे देशात आयात होणाऱ्या वस्तूंवरील आयात शुल्कातून मिळणार आहेत. पेट्रोल डिझेलवरील उत्पादन शुल्कातून ७ पैसे मिळतील. तर, ५ पैसे हे नॉन टॅक्स रेवेन्यूच्या माध्यमातून मिळतील. एक रुपयातील दोन पैसे सरकार बिगर कर्जातून उभारणार.

**असा रुपया खर्च होणार**

केंद्र सरकारकडे आलेल्या रुपयांतून सरकार विविध योजनांसाठी खर्च करणार आहे. यामध्ये २० पैसे हे कर्जावरील व्याज भरण्यासाठी खर्च होणार आहे. तर, १८ पैसे हे सरकारने वसूल केलेल्या करातील, शुल्कातील राज्यांचा हिस्सा म्हणून दिला जाईल. केंद्र सरकार आपल्या योजनांसाठी १७ पैसे खर्च करणार. ९ पैसे हे वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे पैसे हस्तांतरित करेल. केंद्र सरकार पुरस्कृत योजनांसाठी १७ पैसे खर्च होणार आहेत. संरक्षण क्षेत्रावर ८ पैसे खर्च करण्यात येणार आहे. तर, सामान्य नागरिकांना अनुदान म्हणून ७ पैसे खर्च करण्यात येणार आहे. त्याशिवाय, ४ पैसे हे निवृत्तीवेतनावर आणि ८ पैसे हे इतर बाबींवर खर्च होणार आहेत.

या आकडेवारीनुसार, केंद्र सरकार आपल्या महसुलाचा, उत्पन्नाचा मोठा हिस्सा हा कर्जावरील व्याजासाठी खर्च करते. केंद्र सरकार, उत्पन्न आणि खर्चातील तफावत दूर करण्यासाठी आगामी आर्थिक वर्षात १५.४ लाख कोटींचे कर्ज घेणार असल्याचे म्हटले जात आहे. ३१ मार्च २०२३ रोजी संपणाऱ्या सध्याच्या आर्थिक वर्षात एकूण कर्ज हे १४.२१ लाख कोटींहून अधिक आहे.

**वित्तीय तूट कमी करण्याचे उद्दिष्ट**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आपल्या भाषणात म्हटले की, चालू आर्थिक वर्षात म्हणजे आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये, वित्तीय तूट जीडीपीच्या ६.४ टक्के इतकी होती. परंतु पुढील वर्षी म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२४ पर्यंत ती ५.९ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे लक्ष्य आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ पर्यंत त्रृझ च्या ४.५ टक्क्यांपर्यंत करण्याची आणण्याची योजना आहे.

## बांधावरच्या शेतकऱ्यांना हातांना डिजीटल बळ देणार

**नवी दिल्ली :** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज देशाचा अर्थसंकल्प सादर करताना शेतकऱ्यांसाठी डिजीटल प्लॅटफॉर्म उभारण्यात येणार आहे. कृषी स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन निधीची घोषणा करण्यात आली आहे. हा निधी आधुनिक तंत्रज्ञानासाठी वापरला जाणार आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या , शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवत अनेक योजना राबवण्यात येणार आहे कृषी क्षेत्राशी संबंधित स्टार्टअपला प्राधान्य दिले जाणार आहे. यासाठी, तरुण उद्योजकांद्वारे कृषी-स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी ॲग्रीकल्चर एक्सीलरेटर फंड तयार केला जाईल. कापसावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. कापसातून जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. कृषी स्टार्टअप्स निर्माण करण्यावर सरकारचा भर आहे.

भारताला बाजरींचे जागतिक केंद्र



बनविण्यावर भर देण्यात येणार आहे. तृणधान्यांसाठी ग्लोबल हब तयार करण्यात येणार आहे. जरीसाठी जागतिक स्तरावरील संशोधन संस्था बनवण्यात येणार आहे पारंपारिक पद्धतीचे जे पदार्थ आपल्या रोजच्या जेवणात असतात त्यांना ग्लोबल करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. हॉर्टिकल्चरसाठी २२०० कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली आहे, कापसासाठी क्लस्टर आधारित मूल्य साखळी योजना राबवण्यात येणार आहे.


## सर्वांसाठी घर! अर्थसंकल्पात पंतप्रधान आवास योजनेसाठी मोठी तरतूद

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. निर्मला सीतारमण यांनी परवडणाऱ्या घरांच्या योजनेसाठी आणखी बळ दिले आहे. पंतप्रधान आवास योजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. आधीच्या तुलनेत पीएम आवास योजनेत तब्बल ६६ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे.

पंतप्रधान आवास योजनेतंर्गत गरीब, अल्प उत्पन्न गटासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती अथवा लाभार्थ्यांच्या नावे अनुदान दिले जाते. यंदाच्या अर्थसंकल्पात अर्थ मंत्री निर्मला सीतारमण यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या निधीत ६६ टक्क्यांची वाढ केली आहे. आता, पीएम आवास योजनेत ७९ हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

सरत्या २०२२-२३ या आर्थिक वर्षात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी (झचअध) ४८,००० कोटी रुपयांची तरतूद केली होती. देशातील सर्व लोकांना त्यांचे स्वतःचे घर देणे हे प्रधानमंत्री आवास योजनेचे उद्दिष्ट आहे.

या योजनेंतर्गत गरीब कुटुंबांना घरे वाटप केली जातात. यामध्ये ज्यांच्याकडे कायमस्वरूपी घर नाही अशा लोकांना घरे दिली




जातात. गृहनिर्माण योजनेंतर्गत यादी तयार करताना लाभार्थीकडे दुचाकी किंवा तीनचाकी वाहन नाही याची तपासणी केली जाते. यासोबतच इतरही अनेक मानके निश्चित करण्यात आली आहेत.

आतापर्यंत देशातील लाखो लोकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेंतर्गत डोंगराळ भागातील लाभार्थ्यांना एक लाख २० हजार रुपये तर सपाट भागातील घरांच्या बांधकामासाठी एक लाख ३० हजार रुपये देण्यात येतात. या योजनेला सरकारकडून नेहमीच अर्थसंकल्पात प्राधान्य दिले जाते आणि यावेळीही मोठे पाऊल उचलत बजेटमध्ये वाढ करण्यात आली आहे.

**पायाभूत सुविधांच्या विकासासाठी काय तरतूदी**

देशातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आज काही तरतूदी करण्यात आल्या. त्यामध्ये ट्रान्सपोर्ट इन्फ्रास्टक्चर प्रोजेक्टसाठी ७५ हजार कोटी रुपये तर अर्बन इन्फ्रा फंडासाठी दरवर्षी १०००० कोटी दिले जाणार आहेत.

**- ट्रान्सपोर्ट इन्फ्रा प्रोजेक्टवर ७५००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.**

**- अर्बन इन्फ्रा फंडासाठी दरवर्षी १०००० कोटी दिले जातील**

**- गटार साफ करण्याची प्रक्रिया पूर्णपणे मशीनवर आधारित असेल**

**- मिशन कर्मयोगी नागरी सेवकांची कार्यक्षमता वाढविण्याची घोषणा केली**